# विनोबा-वार्ता

दैनिक साम्ययोग

मासिक वर्गणी १.५० न. पै.

अंक : १२५) वर्धा, मंगळवार ता. ११ ऑगस्ट १९६४ (मूल्य ५ न.पै.


दिनांक १-८-६४ ला ग्रामदानी गांवातील प्रतिनीधींची सभा वर्धा येथें गांधी ज्ञान मंदिरांत झाली. त्याच सभेंत ठरले की. दि. ३०-८-६४ ला रविवारी पुन्हा सर्व ग्रामदानी गांवातील प्रमुख कार्यकर्त्यांची सभा घेण्यात यावी. त्या अ ुसांर, वर्धा जिल्ह्यात जी ५८ ग्रामदानी गावें झालेली आहेत. त्या सर्व गांवातील प्रमुख कार्यकर्त्यांची सभा व्हावयाची आहे. तेव्हां सभेला येण्याचे अवश्य करावें.

दि. ३०-८-६४ रविवार वेळ- दुपारी ३ वाजतां

**स्थळ खादी ग्रामोद्योग विद्यालय वर्धा.**

टिप- सायंकाळचे भोजन व निवासाची व्यवस्था खादी ग्रामोद्योग विद्यालयात केली आहे.

## बापू जन्मशताब्दी पर्यंत खादीचा दावा सिद्ध करा नाहीतर तिला तिलांजलि द्या

शिबिरातील कार्यकर्त्यांसमोर आज विनोबांनी खादीचा विचार सांगोपांग मांडला. खादीचे तत्वज्ञान, चरख्यामागील विज्ञान आणि देशाच्या आजच्या बिकट अवस्थेत त्याचे अपरिहार्य स्थान ह्याचे निरुपण त्यांनी आपल्या प्रासादिक वाणीने केले. —संपादक

### जुन्या युगाचे कोसळणारे अवशेष

आम्ही बडोद्याला शिकायला जात असतांना शेजारीच जानवे तयार करणाऱ्या गृहस्थाच्या घरासमोरून जात असूं. आणि त्याकडे बोट दाखवून हा जुन्या युगाचा नमुना म्हणून गंमत करीत होतो. आणि हा पुराण युगाचा अवशेष गेला म्हणजे संपले असे बोलत होतो कारण कापड नव्हे केवळ जानवेच तो बनवीत असे आणि आता पुढे जानवेहि टिकणार नाही असा आमचा समज होता व तो योग्यच होता.

### मशिनरीचे विचारकांकडून स्वागत

बडोद्याला कापडाची पहिली मिल आली तेव्हा वडिलांना खूप आनंद झाला. ड्राईंग केमिस्ट्री हा त्यांचा विषय होता. त्यांनी तो दिवस इतका उत्सवासारखा पाळला आणि कौतुकाने ती बातमी आमच्या आईला व आम्हाला सांगितली की आई त्यांना म्हणाली विनायकाचा (विनोबा) जन्म झाला त्या दिवशी तरी तुम्हाला इतका आनंद झाला होता का ?

### पण करोडोंना काम हवे ह्याचे भान

नवीन मशिनरीचा इतका आनंद त्यावेळच्या आधुनिक विचारकांना वाटत होता. अंड्याच्या बाहेर पडला म्हणजे पक्षी जसां भराऱ्या मारतो तसे जुन्या विचारातून आपण बाहेर पडलो असे त्यांना वाटत होते. राष्ट्रांत आधुनिक युग अवतरले पाहिजे हयाबाबत घरी वडिलांकडून मला जितके ऐकायला मिळाले तेवढे अन्यत्र कोठेच ऐकायला मिळाले नाही. तरीहि गांधीजींनी जेव्हा प्रथम हातकागदाचा उद्योग सुरू केला तेव्हा त्यामुळे खेडुतांना उद्योग मिळाला हया कल्पनेनें त्यांनी त्या ग्रामोद्योगाचे स्वागत केले आणि गांधीजींच्या निमंत्रणावरून ते आले आणि त्यांनी त्याबाबत आपला सल्ला दिला कागदाचा पल्प-लगदा हाताने न करता मशीनच्या सहाय्याने करा व नंतर कागद हाताने बनवा हा त्यांचा सल्ला होता. पण त्यावेळी हाताने काम करण्यावरच जोर असल्यामुळे त्याचा स्वीकार झाला नाही; परंतु काही वर्षांनी गांधीजींनी ती गोष्ट मान्य केली. तेव्हा माझें बाळपणच मशीनरी व टेक्नॉलॉजीच्या वातावरणात गेले. मला वडिलाकडून त्याचे बाळकडूच मिळाले म्हणाना. पण मला ते कधीं गोड वाटले नाही. आज हा प्रश्न आपल्यासमोर उभा आहे.

### मध्यंतरीन कालात विचारकांची ग्रामोद्योगांना मान्यता

त्यावेळी माझ्या वडिलांनी मला दहा बारा पानांचे अेक लांबलचक पत्र लिहिले होते. दुर्दैवाने ते आज उपलब्ध नाही रक्षण करून ठेवण्यासारखे ते होते. त्या कागदावर निळसरपणा होता. ज्या कागदावर त्यांनी ते पत्र लिहिले होते त्या कागदाचे सर्व काम त्यांनी आपल्या हाताने केले होते. कागद, शाई, लेखणी व लिहिलेला मजकूर सर्व त्यांच्याच हातचा होता. त्यांनी लिहिले ह्या सर्व वस्तु मीच तयार केल्या आहेत. कागदावर जो निळसरपणा दिसतो तोहि काढता आला असता पण त्याला परदेशी वस्तु वापराव्या लागल्या असत्या आणि जेवढा निळसरपणा दिसतो तो काही वाईट दिसत नाही. आपल्या देशाला मशीनचा अभ्यास करावा लागेल, इंग्रज लोकांनी जेथून सुरुवात केली त्या दीडशे वर्षापूर्वीच्या ग्रथांचे अध्ययन करावे लागेल. आणि अशा अनेक उताऱ्यांचा संग्रह त्यांनी केला होता. त्यांचे म्हणणे मशिनरी येईल, ती यायलाहि पाहिजे पण आपल्या देशाची लोकसंख्या विशाल आहे तेव्हा मध्यंतरी ग्रामोद्योग लागतील."

चांडिलला मी आजारातून उठल्यावर पंडितजी भेटायला आले होते. ग्रामोद्योगाबाबत मला त्यांचा विचार माहित होता. तेव्हा मी म्हटले "इंटेरिअम पिरिअेड (मध्यंतरीच काळ) साठी काय ? " वडिलांनी शिकविले होतेच आपण ज्या काळात राहतो त्या काळात लोक उपवासी, बेकार राहिले तरी चालेल तीसवर्षानंतर तुम्हाला सुखाचे दिवस येतील असे म्हणून चालेल का ? असे मी त्यांना विचारले.

### नवीन लाभेल तोवर जुन्यांचा आदर करा

नंतर पंडितजीच म्हणाले चीन सिव्हिल वॉर (गृहयुद्ध) मध्ये टिकला ह्याचें कारण त्यांनी गावागावात छोटे उद्योग उभे केले होते. तेव्हा त्यांनी उदाहरण देऊन माझ्या मताची पुष्टी केली. तेव्हा एका बाजूने सुधारणा करीत चालायचे व दुसऱ्या बाजूने प्राप्त अवजारांनी काम चालवायचे हेच धोरण ठेवावे लागेल. नाहीं तर ज्वारी रुचत नाही आणि गहू भेटत नाहीत असे होईल.

'प्राप्तम् प्राप्तम् ...
हृदयेन अपराजित.'

तेव्हा आहेत त्या अवजारांनी पुढें सरसावले पाहिजे. मागे रहायचे नाही. वेळ जाईल तर जावो. तो जाण्यासाठीच आहे. वाया न जावो म्हणजे झाले.

एकदा चीनच्या आक्रमणाच्या संदर्भात पंडितजी म्हणाले 'आम्ही आक्रमण कधीच सहन करणार नाही. प्रसंगी लाठ्या सुरे धेऊ-गोटे मारू पण हार खाणार नाही. आता मशिनगन समोर ही शस्त्रें टिकतील का ? पण त्यांच्या म्हणण्याचा मतीतार्थ हिंमत हारणार नाही. आम्ही पळून जाणार नाही तर सामना देऊ पण माघार घेणार नाही असा होता.

पंडितजी जे रणक्षेत्राबद्दल बोलले तेच मी उद्योगक्षेत्राबाबत सांगत आहे की आजच्या आमच्या जवळ असलेल्या साधनांना अवमानित करू नका. तेव्हा मी त्यांना म्हणालो तुम्ही सहमत झाला ही आनंदाची गोष्ट आहे. गोष्ट ही आहे की माणसाने करण रहावे की उपकरण बनावे ? चष्म्यापेक्षा डोळा महत्वाचा. आम्हाला चष्मा हवा पण डोळा गमावून नव्हे. तेव्हा चष्मे उपलब्ध असावेत पण त्यांची गरजच पडू नये हयाचे नाव प्रगति.

### तकली-चरख्याचा पराक्रम

गांधीजी येरवडा जेलमध्ये होते मी तकलीवर कातायचा. अर्ध्यातासात माझा भाऊ १६० तार कातायचा. मी ७०।८० तार कातायचा. पण रोज अर्धातास सूत काढले तरी किमान वर्षाकाठी लागणाऱ्या १२ वार कापडाची पूर्ति त्यातून होऊ शकते हे आम्ही सिद्ध केले. आणि प्रदर्शन भरवून तकलीजवळ मोठमोठीं ठाणे ठेवून हया साध्या अवजाराची थोर कामगिरी लोकासमोर मांडली.

यंत्राची Efficiency (क्षमता) ह्यावरूनच पाहता येईल की त्याला आत्मदर्शन कितो लवकर होते. तकली चार पांच पैशाला मिळते. पंधरा तास तकलीवर सूत काढले तर ती स्वतःला रिप्लेस करू शकते. म्हणजे पंधरा तासात तकलीला आत्मदर्शन होते.

चरखा चार पांच रुपयाला मिळतो त्याला पंधरा दिवसात आत्मदर्शन होईल आणि अंबरची किमत १२५ रुपये तेव्हा त्याला १२५ दिवस लागणार. तेव्हा किती दिवसात त्या यंत्राची किमत काढता येते हयावरून त्या यंत्राची क्षमता सिद्ध होते. हे अर्थशास्त्रीय प्रमेय मांडत असे.

गांधीजीहि तकलीवर कातू लागले. पण हात व पाठीचा कणा त्यामुळे दुखतो अशी त्यांनी तक्रार केली. मी त्यांना लिहिले तकली तुमच्यासाठी नाही. तरुणासाठी आहे. त्यानंतर मी दुबटा सूत करण्याची पद्धति काढली. जेणें करून सूत मजबूत होऊन कोणालाहि विणता यावे. बापूंनीहि दुबटा करणे सुरू केले आणि दुबटा सूत करण्याचा हुकुम दिला.

www.vinoba.in

### अवजारात सुधारणेची धडपड

मी हे अेवढ्याचसाठी सांगितले की ह्यामागे केवढी तपश्चर्या आणि शास्त्रीय विचार आहे. अेका बाजूला तकली, त्यानंतर धनुष् तकली, चरखा नंतर दहा स्पिंडलच्या चरखा कोणी काढील तर त्याला त्यांनी १ लाख रुपयाचे बक्षीस लावले. ह्यावरून त्यांची दृष्टि बघा. श्री काळे ह्यांनी त्यात-हेचा अेक चरखा बनविला. १९३५ साली मला व काकासाहेबांना त्यांनी परीक्षक नेमले. पण तो गांधीजींनी जाहीर केलेल्या कसोटयांना उतरला नाही.

तेव्हा आहे ते अवजार सुधारायचे आणि हार न खाता जुन्या अवजाराने काम करायचे ही आहे हिंमत. आता अंबर चरखा आला. तो खादीच्या धोरणात बसतो की नाही ह्यावर चर्चा चालली. सतीशबाबूसारख्यागां धींजींच्या निकटच्या काही लोकांचे मत अंबर-विरोधी होते. आणि मी त्याला अनुकूल अभिप्राय दिला. सर्व सेवा संघाने अंबरला मान्यता दिली.

### अंबरने निर्माण झालेले प्रश्न व त्यावर उपाय

हा नवीन अंबर आल्यापासून कीतीतरी प्रश्न उपस्थित होतात. तो किंमती आहे हा पहिला प्रश्न त्याची मधून मधून दुरुस्ती करावी लागते आणि त्याला परिचारक लागतो. ही त्याची तिहेरी गरज पण आणखी मोठी अडचण म्हणजे तो सतत आठ तास चालविणे बायांना शक्यच नाही. ह्याचा आवाजहि होतो. भारी जातो, त्याने क्लेश होतो. अेकवेळ डाव्या उजव्या अशा दोन्ही हाताने चालविणेहि कठीण. साध्या चरख्यावर आठ तास कातताना मी तसा करीत असे. त्यामुळे आराम लाभत होता. ह्यात ते शक्य दिसत नाही. तेव्हा ते येवढ्या शक्तीचे काम आहे की ते विजेनेच का करू नये हा प्रश्न उभा होतो. म्हणजे हा मधे उभा आहे. नृसिंहावतार आहे. म्हणजे मिलला हाणून पाडण्याची जशी ह्यात शक्ति आहे तशीच जुन्या चरख्यालाहि हाणून पाडण्याची त्यात शक्ति आहे. असे प्रश्न ह्या अंबरमुळे निर्माण होतात तर काय करायचे ? तेव्हा अंबर हा ग्रामोद्योग आहे आणि तकली व चरखा हा गृहोद्योग आहे. हे दोन्ही चालवा. गावात जेवढे कापड लागेल त्याच्या ताण्यासाठीं आठदहा माणसे अंबरवर बसवा. आणि बाण्यासाठी तकली चरख्याचे सूत वापरा. अंबरवर कातण्यासाठी जी सात आठ माणसे राहतील त्यांना चार तास अंबरवर काम द्या आणि चार तास शेतीत काम द्या. ह्याप्रमाणे ताण्याबाण्याचे सूत दोन्ही चरख्याद्वारा चालविण्याच्या कल्पनेहून भिन्न कल्पना आजपर्यंत कोणी मांडलेली नाही.

### बेकारी निवारणा पलीकडे खादीचा दावा

शेवटी सांगायचे म्हणजे ह्या चरख्याचा काय दावा आहे ? कोणताहि उद्योग उरला नाही म्हणजे सडक, गिट्टी आदि उद्योग देतात. चरख्याचे असेच रूप ठेवणार का ? लोक स्वावलंबी झाले आहेत व ज्यांना उद्योग नाही त्यांना थोडी मजुरी मिळते असे ह्याचे स्वरूप ठवले तर ते कोणत्याहि सरकारला मान्य होईल. मग ते गांधीजींना मानणारे असोत वा कार्लमार्क्सला मानणारे असोत. लोकांना काम देणे हे सरकारचे काम आहे. तेव्हा डोलहि देत नाही आणि कामहि देत नाही असे होऊ शकत नाही. तेव्हा ही दान योजना होईल. दीन योजना नाही. मी आपल्या कमाईचे खातो असे त्याला वाटेल. ह्या मुद्यावरच काँग्रेस सरकारनें आपल्या योजनेत ह्या उद्योगाला स्थान दिलेले आहे.

ह्या मुद्यावर खादीचा प्रसार केला आणि तुम्ही कीतीहि जोर मारला तर सव्वा टक्का खादी अेका टक्कयावर न्याल. माझे म्हणणे ध्यानात घ्या. सव्वा टक्कयात आणखी अेका टक्कयाची भर टाकाल असे मी म्हणत नाही तर सव्वाटक्कयाचा १ टक्का कराल असे म्हणत आहे. मी असे का म्हणतो ? दरवर्षी जवळ जवळ नवीन ५० लाख लोक जन्माला येतात. माणशी १२ वार कापड धरले तर ६ कोटी गज खादी वाढवावी लागेल टक्केवारी टिकविण्यासाठी. दुसरी गोष्ट धान्याची महागाई वाढत असतांना आणि मिलपेक्षा खादी महागच पडत असतांना महाग खादी घेण्याकडे लोकांचा कल कमी होईल. आणि तिसरी गोष्ट गादीचे तत्वज्ञानी अेकामागून अेक मरत आहेत. ज्यांनी आपल्या आयुष्यात ते प्रयोग केले, उपासना केली तपस्या केली ते जात आहेत.

आणि गांधींनी आपल्या तेजाने ज्याना सूत कातायला लावले तेहि लोक जाणार. चवथी गोष्ट म्हणजे लोकांच्या आकांक्षा वाढणार. आरामाच्या कल्पना बदलणार. तेव्हा आराम चाहतील व मेले तरी कठीण काम करणार नाहीत आणि वरून सायन्सच्या जमान्याचे आकर्षण राहील.

### पूर्वी स्वराज्याचा आधार आता ग्राम स्वराज्याचा

म्हणून मी म्हटले जुन्या पद्धतीने खादी सव्वाटक्कयाची अेक टक्काच होणार आहे. तेव्हा नवीन दिशेने शोध करण्याची आज गरज निर्माण झाली आहे. १९१९ साली चरख्याचा शोध लागला. १९२० साली खादी आली. तेव्हा १९६९-७० साली खादीला पन्नास वर्षे होतात आणि गांधीजींची शंभर भरतात, तेव्हा तोपर्यंत खादीचा दावा तरी सिद्ध करावा नाही तर सांगावे सरकार जाणे बेकार लोकांचे काय करायचे ते. आणि पन्नास वर्षे तप झाले म्हणून छान स्नान करू. जो गुण बाळा तो जन्मकाळा ह्या नात्याने काही जुनी मंडळी आमच्या सारखी भलेहिम गखादी वापरोत.

खादीचा दावा आम्हाला पूर्ण करावयाचा नसेल तर मग आमच्या मृत्यू पूर्वीच तिला तिलांजलि देणें अधिक चांगले. म्हणजे हा मेला व खादी गेली असे फुकटचे श्रेय आम्हाला नको. आम्ही तिला रवाना करून नंतर रवाना होणेच चांगले. खादीचा दावा सिद्ध करायचा असेल तर ५० हजार गावात तरी वस्त्रस्वावलंबनाची खादी ह्या पाच वर्षात उभी करण्याचा कार्यक्रम आखला पाहिजे. तरच पुढे देशात खादीला वेग येईल. आणि देशाच्या अर्थशास्त्रात तिला स्थान प्राप्त होईल.

### खादीची गरज वाढली पण धोकाहि

श्री. लालबहादुर शास्त्रींनी खादीला उद्योग विभागातून काढून सामाजिक सुरक्षा खात्यात टाकले आहे. म्हणजे देशात जे स्थान सैन्याला तेच खादीला मिळाले आहे. मला संवय आहे चांगला चांगला अर्थ काढावा. खादीला मी डिफेन्स मेझर समजतो तेव्हा त्याचा चांगलाच अर्थ केला. सिक्युरिटी—सुरक्षाचा अर्थ म्हणजे संकट टळले तर लष्कर कमीहि करण्यात येते. तसे खादीला स्थान त्यांनी दिले, ती आता औद्योगिक धोरणाची वस्तु त्यांनी ठेवली नाही. त्यामुळे आज तिला पक्के स्थान मिळाले तरी उद्या गरज पडल्यास सुटीहि मिळेल. म्हणून खादी कमिशनने त्याबाबत सौम्य तक्रार केली आहे.

### खादीचे रक्षण करणारे तुम्ही कोण ?

खादीचा दावा कम्युनिस्टाप्रमाणे संपूर्ण जीवनक्रांतीचा आहे. खादी हा विचार आहे. त्याच्या सोबत कितीतरी अन्य गोष्टी येतील. ग्रामदान हा त्याचा पाया आहे. मध्यभागी खादी आणि त्याभोवती पिंजाई, रंगाई इ. उद्योग उभे होतील. शेतकऱ्यांना जोडधंदा मिळेल. तेव्हा आज डोल आणला, तसा घाट घातला तरच तिला न्याय देऊ शकू. एकदा पंडितजी म्हणाले होते खादी ग्रामोद्योगाने तिच्या पायावर उभे रहावे. मी विनोदात उत्तर दिले खादी काय जनावर आहे की ती आपल्या पायावर उभी राहील ? ती आमच्या अंगावर उभी राहील आणि आम्ही आमच्या पायावर उभे राहू. मग मी म्हणालो खादीने आमचे रक्षण केले की नाही ? आईने लहानपणी मुलाचे रक्षण केले आता मुलगा मोठा झाल्यावर आपल्या आईला म्हणाला तू आपल्या पायावर उभी रहा तर कसे होईल? तेव्हा तुम्हीच तिचे रक्षण करणार हे दुसरे उत्तर त्यांना दिले.

( क्रमशः )

---

## विनोबांची प्रकृति

अलिकडे तीन दिवसापासून विनोबांना ताप असतो. गेल्या पंधरवाड्यात शिबिरे, मुलाखती ह्यांचा त्याच्यावर बराच ताण पडला आहे. त्यांना ब्लडप्रेशर आहे. आणि मधुमेहाचेहि काही चिन्ह प्रगट झालेले आहे. रक्तहि कमी आहे. तेव्हा त्यांना विश्रांतीची अत्यंत गरज आहे.

तेव्हा त्यांच्यावर ताण पडू नये म्हणून मुलाखती शिबिरे आदि कार्यक्रम आवरते घेणेच लाभाचे ठरेल.

---

संपादक :-श्री. गोपाळराव काळे, श्री. वसंतराव बोंबटकर,
प्रकाशक:-श्री. वसंतराव बोंबटकर,
मुद्रक:-गो. भा. जोशी, भास्कर प्रेस, वर्धा.
स्वामित्व:-महाराष्ट्र सर्वोदय मंडळ, मुंबई.

साम्ययोग दैनिक ता. ११-८-६४ अं.१२५ र.नं.ए.न.२९५
विनोबा वार्ता, मगनवाडी, वर्धा ( म. राज्य )
श्री. ______________

www.vinoba.in